follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २९३ सातारा मंगळवार दि. ९ जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील पहिले उभे रिंगण अलोट उत्साहात

## पालखी सोहळ्यावर पावसाचे सावट, लाखो वारकऱ्यांच्या निवासाचा प्रश्न

**तरडगाव :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील पहिले उभे रिंगण साताऱ्यातील तरडगाव चांदोबाचा लिंब येथे आज मध्यम पावसात दुपारी साडेचार वाजता अलोट उत्साहात पार पडले. डोळ्यांचे पारणे फेडणारा हा अलौकिक सोहळा अनुभवताना लाखो वैष्णवांनी 'माऊली, माऊली' असा जयघोष करत टाळ मृदंगाच्या आवाजाने आसमंत दणाणून सोडला.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा लोणंदहुन दुपारच्या जेवणानंतर पंढरीकडे निघाला. फलटण तालुक्यातील वेशीवर सरहद्द ओढा येथे मान्यवरांच्या उपस्थितीत स्वागत झाले. या प्रसंगी आ. दिपक चव्हाण, संजीवराजे नाईक निंबाळकर, कापडगाव सरपंच,'प्रांताधिकारी, तहसिलदार आदी मान्यवर उपस्थित होते. नंतर पालखी सोहळा तरडगाव मुक्कामी मार्गस्थ झाला. पहिल्या उभ्या रिंगणासाठी चांदोबाचा लिंब येथे नगारा, माऊलींचे घोडे, दिंड्या आल्या, माऊलींच्या रथापुढील २७



व १२५ दिंड्या मध्ये चोपदाराने ऊभे रिंगण लाऊन घेतले, दुपारी साडेचारला हलक्या व मध्यम पावसात धावत येणाऱ्या माऊलींच्या त्या अश्वांना पाहण्यासाठी असंख्य नजरा आतूर झाल्या होत्या. उत्साही वातावरणातच सायंकाळी साडेचार वाजता दोन्ही अश्व वैष्णवांच्या मेळ्यातून एकमेकांशी स्पर्धा करीत धावले. या दोन अश्वांनी नेत्रदीपक दौड घेत रथाकडे आले. त्यांनी रथाला प्रदक्षिणा घालत पादुकांचे दर्शन घेतले. यावेळी अश्वांना बुक्का लावून हार घालण्यात आला, डाळ गुळाचा नैवेद्य देण्यात आला. त्यानंतर पुन्हा अश्वांनी जोरात धाव घेत उभे रिंगण पूर्ण केले. यावेळी वारकऱ्यांनी माऊलीं माऊलींच्या म्हणत जोरदार जल्लोष केला. यावेळी अश्वांच्या टापाची माती ललाटी लावण्यासाठी एकच झुंबड उडाली. यानंतर पालखी सोहळा तरडगाव मुक्कामी मार्गस्थ झाला.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यावर पावसाचे सावट आले आहे. आज तरडगाव(तरडगाव) मुक्कामी पावसाने हजेरी लावल्याने लाखो वारकऱ्यांच्या निवासाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे सातारा प्रशासनाची धावपळ सुरू झाली आहे . साताऱ्यातील तरडगाव (ता फलटण) चांदोबाचा लिंब येथे आज मध्यम पावसात दुपारी साडेचार वाजता अलोट उत्साहात पालखी सोहळ्यातील पहिले उभे रिंगण पार पडले. लोणंद वरून अडीच दिवसांच्या मुक्कामानंतर पालखी सोहळा चांदोबाचा लिंब येथे उभे रिंगण करून तरडगाव मुक्कामी आला. तोपर्यंत पालखी सोहळ्यावर पावसाचा जोरदार वर्षाव झाला. त्यामुळे दिंड्यांच्या मुक्कामातील राहुट्या साठी उभारलेल्या तंबूत पाणी शिरले. सगळीकडे चिखल झाला आहे.याच पावसात साडेसहा वाजता तळावर सर्व दिंड्या पोहोचल्या. पालखी तळावर चोपदारांनी दंड उंचावल्यावर सर्वत्र शांतता झाली. चोपदारांनी सूचना केल्या. समाज आरती पावसातच होऊन माऊली एक दिवसासाठी तरडगाव मुक्कामी विसावली. या पावसाने वारकऱ्यांच्या विश्रांतीमध्ये अडचण निर्माण झाली आहे. पावसाचा अंदाज न आल्याने वेळीच खबरदारी न घेतल्याने वारकऱ्यांना चिखलातच मुक्काम करावा लागणार आहे. गावातील व आजूबाजूच्या परिसरातील सर्व शाळा समाज मंदिरे, मंगल कार्यालये, ग्रामपंचायतच्या मिळकतीमध्ये वारकऱ्यांचा मुक्काम आहे. ज्या ग्रामस्थांच्या घरी मुक्काम करता येईल तिथे वारकरी मुक्काम करत आहेत. तरीही अनेक वारकरी जागे अभावी प्रशासनाच्या मदतीच्या आशेवर आहेत.

सातारा जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांच्या सेवा सुविधेसाठी मोठी व्यवस्था केलेली आहे. त्यांना कोणतीही अडचण भासू नये अशी काळजी प्रशासनाने घेतलेली आहे. तरी आज अचानक आलेल्या पावसाने पालखी सोहळ्यातील लाखो वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या व्यवस्थेत मोठी अडचण आली आहे. त्यामुळे अचानक आलेल्या अडचणीवर मात करण्यासाठी प्रशासनाची शिकस्त सुरू आहे. वारकऱ्यांच्या निवासाबाबत अधिक माहिती घेण्यासाठी फलटणच्या प्रांताधिकारी व तहसीलदारांशी संपर्क साधला असता वारीच्या ठिकाणी नेटवर्क यंत्रणा विस्कळीत होत असल्याने होऊ शकला नाही. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, यावेळी वारकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आपण त्यांच्या व्यवस्थेची खूप काळजी घेतली आहे. तरीही आज सकाळपासून पावसाचा अंदाज होता. त्यामुळे वारकऱ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी आपण जास्तीत जास्त प्रयत्न केले आहेत. आपण वारकऱ्यांची काळजी घेत आहोत. जिथे शक्य आहे तिथे ताडपत्री टाकून कुठे काही व्यवस्था करता येते. तिथे करून वारकऱ्यांच्या निवासाचा प्रश्न मार्गी लावत आहोत. आमचे सर्व प्रशासन सध्या तरडगाव मध्ये आहे.

# शरद पवारांनी माण खटावसाठी काय केले : जयकुमार गोरे



**सातारा:** शरद पवारांनी माण खटावसाठी काय केले हे जाहीरपणे सांगावे, असे आव्हान भाजप आमदार जयकुमार गोरे यांनी शरद पवार यांना दिले. समाजात द्वेष पसरवून चुकीची आणि समाज विघातक वक्तव्य करून राजकारण करण्याचा शरद पवार यांचा हातखंडा आहे. माण खटाव मध्ये कधी उरमोडी, जिहे कटापूरच्या पाणी प्रश्नावर ते बोलले नाहीत. त्यांनी या भागात एकही मोठे काम केले नाही. त्यांना फक्त माझा पराभव करायचा आहे. त्यांनी पंधरा वर्षात येथील जनतेसाठी काय केले हे जाहीरपणे सांगावे असे आव्हान जयकुमार गोरे यांनी दहिवडी (ता माण) येथील कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना केले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

बारामतीतून सांगावा आला की सगळे माझ्या विरोधात एकत्र येतात. माझ्या विरोधात जनतेला न पटणारे खोटे ठरवून आलेले सांगतात. काहीही केले तरी खटाव-माणची जनता मी १५ वर्षात काय केले आहे, हे त्यांना सांगण्याची गरज नाही. विरोधकांकडे विकासकामे, पाणीप्रश्नावर निवडणूक लढविण्याचा कोणताच अजेंडा आणि व्हिजन नाही. त्यांचा तो आवाकाच नसल्याने जयकुमारच पुन्हा आमदार होतील, असे ते खासगीत सांगत आहेत.

विधानसभा निवडणूक आली की ते अनेकांना चावी देतात. विरोधकांकडे निवडणूक लढण्याचा उद्देशच नाही. त्यांना फक्त माझा पराभव करायचा आहे. त्यांनी १५ वर्षात जनतेसाठी काहीच केले नाही. त्यांची माझ्यावर बोलायची पात्रताच नाही, असे गोरे म्हणाले. लवकरच माण तालुक्यातील रिक्त पाणी योजनांचे भूमिपूजन करत असल्याने पाणी प्रश्नावर ही माझी शेवटची निवडणूक असेल असेही गोरे यांनी सांगितले.

मराठा समाजाला आमच्या सरकारने दहा टक्के आरक्षण दिले आहे. पोलीस भरतीतही आरक्षण आहे. मात्र ते सतत खोटे बोलत आहेत. दलित आणि मुस्लिम बांधवांचा यांनी खोटे बोलून समाजात द्वेष परविण्याचे काम केले. कोणीही जनतेला माझ्या विरोधात कितीही खोटे सांगितले. कोणी काहीही केले. तरी यावेळी पुन्हा मीच आमदार होणार आहे असे ते म्हणाले.

# एमपीएससी परीक्षेला अतिवृष्टीचा फटका

पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) आज (८ जुलै) टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्यात आली आहे. मुंबईमध्ये ही परीक्षा होत आहे. मात्र मुंबईत होत असलेल्या अतिवृष्टीचा फटका या परीक्षेला बसला आहे. त्यामुळे एमपीएससीने तातडीने उपाययोजना केली आहे.

कौशल्य टंकलेखन परीक्षेसाठी राज्यभरातून उमेदवार मुंबईत दाखल झालो आहेत. एकूण चार सत्रांमध्ये ही परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र मुंबईत अतिवृष्टी सुरू असल्याने या परीक्षेचे नियोजन बाधित झाले आहे. त्यामुळे या परीक्षेबाबत आयोगाने तातडीने उपाययोजना केल्या आहेत. या संदर्भात एमपीएससीने एक्स या समाजमाध्यमातील अधिकृत खात्याद्वारे माहिती दिली.

मुंबईमध्ये अतिवृष्टीमुळे रेल्वे सेवा व इतर वाहतूक सेवा काही प्रमाणात विस्कळीत झाल्याने दिनांक ८ जुलै २०२३ रोजी आयोगामार्फत आयोजित चारही सत्रांची टंकलेखन कौशल्य चाचणी ही नियोजित वेळेपेक्षा ४५ मिनिटे उशिराने सुरू करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. तसेच उमेदवारांना परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्याची अंतिम वेळ प्रत्येक सत्राकरिता ४५ मिनिटांनी वाढवण्यात येत आहे. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी, अशी माहिती एमपीएससीने स्पष्ट केले.

काही दिवसांपूर्वी याच परीक्षेबाबत गोंधळ उडाला होता. महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२३, मधील लिपिक टंकलेखक व करसहायक या संवर्गाची 'टंकलेखन कौशल्य चाचणी' परीक्षेत पहिल्याच दिवशी तांत्रिक गोंधळ उडाल्याने १ ते ३ जुलैपर्यंतची परीक्षा रद्द करण्यात आली होती.

# ते विधान अनावधनाने : नीलम गोऱ्हेंची कबूली

**मुंबई :** आमदार अनिल परब यांच्या संदर्भात केलेले अनावधानाने होते. मात्र, ते तपासून सभागृहाच्या पटलावरून काढून टाकते, अशी कबुली उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सोमवारी विधान परिषदेत दिली. पक्षप्रमुखांना सभागृहात कामकाज कसे करतो हे दाखविण्यासाठी आणि परिषदेचे विरोधी पक्षनेते पद मिळावे, याकरिता सगळा परब यांचा खटाटोप सुरू आहे, असे विधान गोऱ्हे यांनी शुक्रवारी केले होते. परब यांनी सोमवारी विधान परिषदेत त्यावर हरकतीचा मुद्दा मांडत, संबंधित वकत्व्य पटलावरून काढून टाकण्याची मागणी केली.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विरोधक आणि उपसभापती मध्ये अनेकदा खटके उडताना दिसतात.



विरोधकांना उपसभापती बोलू देत नाहीत, असा सातत्याने आरोप होतो. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निलंबनाच्या दिवशीही विरोधकांना बाजू मांडण्याची संधी दिली नाही, असे सांगत उपसभापतींनी गळचेपी केली, असा आरोप केल्याने परब आणि गोऱ्हे यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली होती. शुक्रवारी देखील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या अर्थसंकल्पावरील भाषणावेळी सभागृहात राज्य अर्थमंत्री उपस्थित नाहीत, ही बाब परब यांनी उपसभापतींच्या निदर्शनास आणून दिली. तसेच मंत्री येणार नाहीत तोपर्यंत कामकाज थांबवावे, अशी मागणी लावून धरली. दरम्यान, परब आणि नीलम गोऱ्हे यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. उडालेल्या गोंधळात गोऱ्हे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना दाखविण्यासाठी सगळा खटाटोप सुरू आहे. तसेच तुम्हाला निलंबित करेन, असे वक्तव्य केले होते.

यासंदर्भात सोमवारी अनिल परब यांनी हरकतीचा मुद्दा मांडून तीव्र नाराजी व्यक्त केली. मी काय काम करतो, हे उद्धव ठाकरेंना दाखवायची गरज नाही. त्यांच्यामुळेच चार वेळा आमदार आणि सत्ता असताना मंत्री झालो. आता तुम्हाला असे म्हणायचे का, उपसभापती पदासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना किती काम करतेय, हे दाखवायचे आहे. विरोधकांना त्यामुळे बोलू देत नाही, असे बोललो तर तुम्हाला निश्चित किती राग येईल? जेव्हा चुकीचे असू तेव्हा कारवाईचे पूर्णतः अधिकार तुम्हाला आहेत. मात्र, अशा संदर्भातील वक्तव्य योग्य नाही. ते तातडीने कामकाजातून काढून टाका, अशी मागणी करताना निशाणा साधला. नीलम गोऱ्हे त्यावर खुलासा केला. अनावधानाने माझ्या तोंडून ते शब्द आले. सभागृहात दोन्ही बाजूनी सतत गोंधळ घालायचा प्रयत्न होतो. परंतु तुमच्या संदर्भातील विधान तपासते आणि काढून टाकते, असे सांगत

# 'ड्रंक ॲण्ड ड्राइव्ह' रोखण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतला महत्त्वाचा निर्णय

मुंबईतील ड्रंक ॲण्ड ड्राइव्हची प्रकरणे रोखण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई पोलीस आयुक्तांना सूचना दिली असून यासाठी रस्ते, चौक, वर्दळीची प्रमुख ठिकाणे यासह नाक्या-नाक्यांवर वाहन चालकांची तपासणी करून ड्रंक ॲण्ड ड्राइव्ह प्रकरणी कडक कारवाई करण्यात यावी, अशी सूचना त्यांनी दिली आहे. त्याचबरोबर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पब्ज आणि बारवरही कारवाई करण्यात यावी, अशी सूचनाही मुंबई महानगरपालिकेसह पोलीस प्रशासनास देण्यात आली आहे.

विशेषत: रात्रीच्या वेळेस तसेच विकेंडच्या दिवशी तपासण्यांचे प्रमाण वाढविण्यात यावे. मद्य सेवन करुन वाहने चालविणाऱ्या



चालकांवर कडक कारवाई आणि दंडाची वसुली करण्यात यावी. त्याचबरोबर नियमाचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर (ठशशिरीं `षषशपवशीी) कडक कारवाई करण्यात यावी. अशा हॅबिच्युअल वाहन चालकांचे परवाना रद्द करण्यात यावेत. मुंबई महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने शहरातील पब्ज, बार आणि रेस्टॉरंट्सची नियमित तपासणी करावी. पब्ज, बार, रेस्टॉरन्ट चालू ठेवण्याची वेळ, ध्वनिप्रदुषणाचे नियम, आवश्यक परवाने यासंदर्भात वेळोवेळी तपासण्या करण्यात याव्यात. रात्री उशीरा सुरू राहणारे बार, पब्ज आणि रेस्टॉरंटवर कारवाई करण्यात यावी त्यांचे परवाने रद्द करण्यात यावेत. महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने यासाठी समन्वयाने काम करावे, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या आहेत.

मद्य सेवन करुन वाहने चालविण्याच्या होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यात यावी. लोकांची सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्थेचे पालन होण्याच्या अनुषंगाने अशा प्रकरणी सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी कडक कारवाई करावी, अशी सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली आहे.

# मुंबईत ३०० मिलिमीटर एवढा पाऊस

**मुंबई :** मुंबईसह ठाणे, पालघर व आजूबाजूच्या जिल्ह्यांना रविवारी (७ जुलै) मध्यरात्रीपासूनच मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. यामुळे आज, सोमवारी (८ जुलै) सकाळीपासूनच नोकरदार वर्गाची तारांबळ उडाली आहे. मध्य रेल्वेची वाहतूक सेवा कोलमडल्याने चाकरमण्यांना त्याचा फटका सहन करावा लागला. पावसामुळे मध्य आणि हार्बर रेल्वेच्या वाहतूक सेवेवर परिणाम झाला. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महापालिकेच्या कंट्रोल रुममधून परिस्थितीचा आढावा घेतला. विक्रमी पावसामुळे पाणी साचलं होतं, पण आता परिस्थिती नियंत्रणात येत आहे असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबईत काल रात्रीपासून २६७ ते ३०० मिलिमीटर एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला आहे. नागरिकांना मदतीसाठी सर्वोच्च प्राधान्य दिले जात असून सर्व यंत्रणा २४ तास अलर्ट मोडवर असल्याची ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले की, एरवी मुंबईत ६५ मिलिमीटर पाऊस झाला की अतिवृष्टीची परिस्थिती निर्माण होते. मात्र रात्रीपासून २६७ ते ३०० मिलिमीटर पाऊस झाला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने रेल्वे मार्ग आणि चुना भट्टी, सायन याभागात पाणी साचले.. साचलेल्या पाण्याचा निचरा तातडीने होण्यासाठी रेल्वेने आणि मुंबई महानगरपालिकेने पंप बसविले आहेत.

एकाच वेळी एवढा पाऊस झाल्याने त्याचा निचरा होण्यासाठी वहन क्षमता तयार केली जात आहे. मुंबई महानगरपालिकेने केलेल्या होल्डिंग पाँण्डस् मुळे यंदा मिलन सबवे, हिंदमाता भागात पाणी साचले नसल्याचे सांगत मायक्रो टनेलिंग सारखा प्रयोग देशात पहिल्यांदा केल्यामुळे निचरा होण्यासाठी मदत होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सकाळपासूनच आपण रेल्वे, बीएमसी आणि राज्य आपत्ती विभागाच्या मुख्य सचिवांच्या संपर्कात आहे. रायगड, सिंधुदुर्ग, जळगाव, पालघर या ठिकाणी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे मी एनडीआरएफ प्रमुखांसह आर्मी, नेव्ही आणि एअर फोर्स या दलांशीही सकाळी चर्चा केली आहे. त्यांना अलर्ट राहण्याची सूचना करण्यात आली आहे. कुठे काही झाले आणि त्यांची मदत लागली, तर आपल्याला ती घेता येईल, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

# मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेसाठी ५५०० कोटी



सांगली : जिल्हा बँकेत ५० कोटींच्या नुकसानप्रकरणी आजी, माजी संचालकासह ४१ जणांना नोटीसा

आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन शासकीय योजना जनतेपर्यंत पोचविण्यासाठी हे योजनादूत सहा महिन्यांसाठी नियुक्त करण्यात येणार असून त्यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात घोषणा केली होती. कौशल्यविकास विभागाच्या माध्यमातून तरुणांना रोजगारसंधी उपलब्ध करून देतानाच त्याअंतर्गत हे योजनादूत निवडले जातील. प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात एक आणि शहरी भागात पाच हजार लोकसंख्येमागे एक योजनादूत नेमले जाणार आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी नगरविकास आणि ग्रामविकास विभागाकडे दिली असून महापालिका आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका मुख्याधिकारी यांना हे योजनादूत नियुक्तीचे अधिकार देण्यात आले आहेत.

बारावी, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर आदी शिक्षण घेतलेल्या तरुणांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्यविकास विभागाने संकेतस्थळ सुरू कैले आहे. खासगी कंपन्या, उद्योग, लघुउद्योग, सहकारी संस्था, निमशासकीय संस्था, महामंडळे आदींनी त्यांना ज्या प्रकारचे कौशल्य शिक्षण घेतलेले उमेदवार हवे आहे, त्याबाबतची नोंदणी संकेतस्थळावर करायची आहे. तरुणांनीही आपल्या प्रशिक्षणानुसार नावनोंदणी करणे आवश्यक आहे. सुमारे १० लाख तरुणांना मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेचा लाभ देण्याचे नियोजन आहे.

**शिंदे गटाच्या प्रवक्त्यांकडे जबाबदारी**

राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती सामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे यांची मुख्यमंत्री जनकल्याण कक्षात राज्य प्रचार व प्रसार समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# तीन वर्षात १६ हजार ८८५ अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडी केंद्रांमध्ये रुपांतर

## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे



**मुंबई** : शासनाच्या स्व-मालकीच्या जागेतील अंगणवाड्यांमधून दरवर्षी पाच हजार अंगणवाड्या स्मार्ट करण्याची योजना सुरू आहे. याअंतर्गत मागील तीन वर्षात १६ हजार ८८५ अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडी केंद्रांमध्ये रुपांतर झाले असून याची गती वाढविण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितली जाणार आहे, अशी ममाहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधान परिषदेत दिली. तसेच भाडेतत्वावरील अंगणवाड्यांसाठीच्या भाड्यामध्ये दुपटीने वाढ केली असून अधिकची वाढ करण्याबाबत सकारात्मक पावले उचलली जातील, अशी ग्वाही दिली.

राज्यातील अंगणवाड्यांसंदर्भात आमदार भाई गिरकर यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. भंडारा जिल्ह्यातील शहरी व नागरी चौदाशे सतरा अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. त्यातील १२४८ स्वमालकीच्या इमारती आहेत. ७४५ व उर्वरित ५०३ अंगणवाड्या केंद्राचे टप्प्याटप्प्याने स्मार्ट अंगणवाडी रूपांतर करणार असल्याचे म्हटले आहे. परंतु १४१७ वजा १२४८ आणि १०६९ अंगणवाड्यांना इमारतीच नाहीत. नियमित विजेचे कनेक्शन आणि सोलर सिस्टिम या सर्व अंगणवाड्यां जोडल्या जाणार आहेत का? राज्यात १ लाख १० हजार ५५६ अंगणवाड्या केंद्रापैकी ७२ हजार ३०० अंगणवाडी केंद्र इमारतीत आहेत. त्यापैकी ९३ हजार ६७१ अंगणवाड्या या स्मार्ट करण्याचे अद्याप बाकी आहे, राज्यात पहिल्या टप्प्यात किती अंगणवाड्या स्मार्ट करण्यात आल्या, याचा खुलासा करावा, अशी मागणी केली. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह सत्यजित तांबे, ज्ञानेश्वर म्हात्रे, गोपीचंद पडळकर, जयंत पाटील, सुनील शिंदे आदींनी राज्यातील अंगणवाड्यांचा मुद्दा शासनाच्या निदर्शनास आणून दिला. मंत्री आदिती तटकरे यावर स्पष्टीकरण दिले.

राज्यात १ लाख १० हजार ५५६ अंगणवाडी केंद्र आहेत. यापैकी ७२,३७९ केंद्र स्वमालकीच्या जागेत आहेत. ज्या केंद्रांना स्वमालकीची जागा नाही तेथे जागा उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे. जेथे अंगणवाडी केंद्र नाहीत अशा ८०८४ नवीन अंगणवाडी केंद्रांचे प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले आहेत. ज्या अंगणवाडी केंद्रांना वीज उपलब्ध होत नाही अथवा वीज खंडित होते त्याठिकाणी सोलरच्या माध्यमातून ही अडचण दूर करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईतील झोपडपट्टीमध्ये ५१४७ अंगणवाडी केंद्र आहेत. महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण अंगणवाडी केंद्रांपैकी २० ते २५ टक्के केंद्र महिला व बालविकास विभागांतर्गत आहेत. इतर केंद्र महानगरपालिकेमार्फत सुरू आहेत. अंगणवाडी केंद्राचा सर्व मुलांना लाभ व्हावा यासाठी शासन आणि महानगरपालिकेमार्फत एकत्रित प्रयत्न करण्यात येतील. ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होत नसेल अशा ठिकाणी सुविधा असलेल्या कंटेनरमध्ये अंगणवाडी सुरू करण्याचे धोरण आहे. एसआरएमधील जागा उपलब्ध होण्यासाठी देखील प्रयत्न करण्यात येत आहेत. महानगरपालिका क्षेत्रातील भाडेतत्वावरील अंगणवाडी केंद्रांच्या भाड्याच्या रकमेत चार हजार वरून आठ हजार, अ वर्ग नगरपालिका क्षेत्रात तीन वरून सहा हजार, तर ग्रामीण भागातही भाड्याच्या रकमेत दुपटीने वाढ करण्यात आली असल्याचे मंत्री तटकरे यांनी सांगितले. अंगणवाडी केंद्राच्या जागेत स्वच्छता असावी, तसेच भाड्याच्या जागेसाठी रेडीरेकनर प्रमाणे भाडे द्यावे, अशी सूचना उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी यावेळी केली.

# अतिवृष्टीच्या शक्यतेमुळे नवी मुंबई शहर, रत्नागिरी, सिंधुदुर्गसह ठाण्यातील सर्व शाळांना सुट्टी

**नवी मुंबई** : हवामान विभागाकडून वर्तविण्यात आलेल्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर अतिवृष्टीच्या अनुषंगाने इ. १ ली ते १२ वी च्या सर्व माध्यमाच्या/मंडळाच्या शालेय विद्यार्थ्यांची शाळेत ये-जा करण्याची गैरसोय होऊ शकते. याचा विचार करता शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ठाणे जिल्ह्यातील सर्व शाळांना दि. ०९/०७/२०२४ रोजी सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालये (अंगणवाडी, पूर्व प्राथमिक व प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालय) विद्यार्थ्यांना उद्या मंगळवार दि. ९ जुलै रोजी सुट्टी जाहीर करण्यात आल्याचा आदेश जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी दिला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व शाळा आणी महाविद्यालय उद्या बंद राहणार आहेत. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने जाहीर केले आहेत.

जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्वसूचनेवरून जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन, संपूर्ण जिल्ह्याकरिता अथवा जिल्ह्यातील ठराविक स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून प्रदान करण्यात आले आहेत. आपती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत. शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित

हवामान विभागाने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार रत्नागिरी जिल्ह्यात उद्या दिनांक ९ जुलै रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आलेला आहे. जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस सुरु असल्याने तसेच खेड तालुक्यातील जगबुडी नदीने धोका पातळी ओलांडली आहे. संगमेश्वर येथील शास्त्री व बावनदी, लांजा येथील मुचकुंदी व काजळी नदी, राजापूर येथील कोदवली नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. जिल्ह्यात अनेक भागात पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुसूचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये याकरिता जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालये (अंगणवाडी, पूर्व प्राथमिक व प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालय) विद्यार्थ्यांना उद्या दिनांक ९ जुलै रोजी सुट्टी असणे आवश्यक आहे.

# आगामी विधानसभा निवडणुकीत रोहित पाटलांना शक्ती द्या : शरद पवार



## कवठेमहांकाळ येथील झालेल्या शेतकरी मेळाव्यात रोहित पाटील यांच्या उमेदवारीचे दिले स्पष्ट संकेत

**कवठेमंहाकाळ :** राष्ट्रवादीचे दिवंगत नेते आर.आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन कवठेमंहाकाळ येथे करण्यात आले होते. या शेतकरी मेळाव्यातच शरद पवार यांनी आगामी विधानसभेसाठी युवा नेते रोहित पाटील यांना शक्ती द्या अशी घोषणा केली. याचबरोबर आगामी विधानसभेसाठी रोहित पाटील यांची उमेदवारीचे स्पष्ट संकेतच पवारांनी आपल्या भाषणात दिल्याची जोरदार चर्चा मेळाव्यास्थळी झाली.

आज कवठेमहांकाळ येथील महांकाली कारखान्याच्या मैदानावर झालेल्या शेतकरी मेळाव्यासाठी राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पाटील यांच्याकडून मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले होते. तासगाव कवठेमहांकाळ मतदारसंघातून मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांची गर्दी दिसून आली. आगामी विधानसभेच्या दृष्टीने या शेतकरी मेळाव्यास मोठे महत्त्व प्राप्त झाले होते.

शरद पवार यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या शेतकरी मेळाव्यात युवा नेते रोहित पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा होणार की काय याकडे सर्वांचे लक्ष होते.

या दृष्टीने महाराष्ट्रात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून तासगाव कवठेमंकाळ विधानसभा मतदारसंघासाठी रोहित पाटील यांच्या उमेदवारीचे स्पष्ट संकेत देण्यात आले.

# विभागीय शासकीय क्रीडा संकुलाला छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव ; पालकमंत्री हसन मुश्रीफ

## कोल्हापुरात संकुलाच्या समस्यासंबंधी झाली आढावा बैठक



**कोल्हापूर** : कोल्हापुरातील विभागीय शासकीय क्रीडा संकुलाला छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव दिले जाणार आहे. याविषयीचा प्रस्ताव तातडीने शासनाला सादर करा, अशा सूचना पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी प्रशासनाला दिल्या. या क्रीडा संकुलाच्या समस्यांचे निराकरण करून ते जास्तीत जास्त अद्ययावत करण्यासाठी प्रयत्न करू, असेही मंत्री मुश्रीफ म्हणाले.

यावेळी हिंदकेसरी पैलवान दिनानाथ सिंह यांनी पालकमंत्री मुश्रीफ यांच्याकडे या विभागीय क्रीडा संकुलात दोन कुस्तीच्या मॅटचे आखाडे आहेत. मातीचाही आखाडा असावा, अशी मागणी केली.

विभागीय क्रीडा संकुलातील कामांच्या जबाबदाऱ्या निश्चित करा. ज्या बाबी पूर्ण झाल्या आहेत आणि ज्या बाबी अपूर्ण आहेत, त्यांची यादी तयार करा. क्रीडा संकुलात असलेल्या त्रुटींचा अभ्यास सदस्यांनी प्रत्यक्षात जाऊन करावा.तसा अहवाल तयार करावा केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून निधीसाठी वेगवेगळे प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना मंत्री मुश्रीफ यांनी दिल्या.

या बैठकीला खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, आमदार राजेश पाटील, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तुषार बुरुड, जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ, तालुका क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण, सुधाकर जमादार, अमर सासणे, प्रफुल पाटील आदी उपस्थित होते.

# वांद्रे-वरळी सी-लिंकवर टोलवाढ

## सातारा, पुणेसह मुंबईकरांच्याही खिशाला फटका!

**राजदंड / मुंबई**

पुणे-सातारा आणि पुणे-नाशिक प्रवास महागणार असून १ एप्रिलपासून टोल दरात वाढ होणार आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांच्या खिशाला कात्री बसणार आहे. पण यासोबतच आता मुंबईकरांच्याही खिशाला भार सोसावा लागणार आहे. याचं कारण म्हणजे वांद्रे-वरळी सी लिंक म्हणजेच राजीव गांधी समुद्र सेतूवरुन प्रवास करणाऱ्यांसाठी १ एप्रिलपासून टोलमध्ये वाढ (ऊदत्त प्ज्ञा) करण्यात आली आहे. ही टोल वाढ १८ टक्के एवढी करण्यात आली आहे.

वांद्रे-वरळी सी लिंकवरुन प्रवास करणं आता महाग होणार आहे. मुंबईच्या पश्चिम उपनगरांना शहराच्या दक्षिणेकडील भागातील जोडण्यासाठी हा सेतू महत्त्वाचा आहे. या टोल वाढीमुळे सध्याच्या कार आणि जीपचे टोल ८५ रुपयावरून १०० रुपयावर जाणार आहेत. तसेच मिनीबस, टॅम्पो आणि इतर वाहनांमधील प्रवाशांना १३० रुपयावरुन १६० रुपये आकारले जाणार आहेत. तर एकेरी प्रवासासाठी १७५ रुपये ऐवजी दोन एक्सेल ट्रकसाठी २१० रुपये आकारले जाणार आहेत.

**१ एप्रिल २०२४ पासून तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना**

दरम्यान, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने टोलमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. याची तात्काळ अंमलबजावणी १ एप्रिल २०२४ पासून होणार असल्याची माहिती देखील मंडळाने दिली आहे. माहीम दादर प्रभादेवी वरळी भागातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पश्चिम उपनगरातील वाहनधारक या सागरी सेतूचा उपयोग करत असतात. तर याच सागरी सेतुला आता धर्मवीर छत्रपती संभाजी राजे सागरी किनारा मार्ग सुद्धा जोडण्यात येत आहे. हा सागरी किनारा रस्ता सिलिंगला जोडल्यास यावरुन वाहनांची संख्या आणखी वाढणार आहे.

# सुधीर मुंगसे आयोजित रोजगार मेळाव्यात शेकडो युवक युवतींना मिळाली नोकरीची संधी

**राजगुरूनगर (वा.)** : बहुराष्ट्रीय कंपन्यांचं जाळं असलेल्या चाकण औद्योगिक वसाहत उशाला असतानाही खेड तालुक्यात बेरोजगारी आ वासून आहे. रोजगारासाठी धावाधाव करणा-या या तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी मी सेवेकरी सोशल फाउंडेशन आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रौप्य महोत्सवी वर्षानिमित रोजगार मेळावा घेण्यात आला. भाम येथील साई कृपा मंगल कार्यालयात रविवारी, दि. ७ जुलै रोजी हा रोजगार मेळावा झाला.

या मेळाव्यात सहभाग नोंदविलेल्या १४७८ युवकांपैकी शेकडो युवक युवतींची ३५ कंपनीच्या

प्रतिनिधिमार्फत मुलाखतीद्वारे निवड झाली. तसेच या युवक-युवतींना राज्यातील विविध नामांकित कंपन्यांमधून 'ऑन द जॉब ट्रेनिंग'ची रोजगार संधी उपलब्ध झाली. मेळाव्याच्या उद्घाटन सोहळ्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ बापू शेवाळे, खेड तालुका अध्यक्ष हिरामण सातकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष अशोक खांडेभराड, मी सेवेकरी सोशल फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष सुधीर मुंगसे, माजी उपसभापती सतीश राक्षे, महिला तालुकाध्यक्षा मनिषा सांडभोर, युवक तालुकाध्यक्ष ॲड. विशाल झरेकर, बाजार समितीचे संचालक सोमनाथ मुंगसे आदी उपस्थित होते. दरम्यान, रोजगार मेळाव्यासाठी भोसरी विधानसभेचे माजी आमदार विलास लांडे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अतुल देशमुख, बाजार समितीचे संचालक विजयसिंह शिंदे, आदींनी भेट दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य संयोजक सुधीर मुंगसे यांनी केले.

# राज्य शासनाकडून मतदानादिवशी भर पगारी सुट्टी देण्याचे आदेश

**राजदंड / पुणे**

राज्यातील लोकसभेच्या ४८ मतदारसंघांसाठी पाच टप्प्यात मतदान होणार आहे. १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि ५ मे या दिवशी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. नोकरी, व्यवसाय, रोजगारानिमित्त अनेकांनी स्थलांतर केले असले, तरी त्यांचे मतदान मूळगावी, दुसऱ्या मतदारसंघात असते. त्यामुळे अनेक मतदारांना कामावरून सुटी दिली जात नाही. याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे राज्य शासनाने सर्व आस्थापनांना खासगी, शासकीय संस्था, महामंडळे, उद्योग, व्यावसायिक आणि महामंडळाच्या संस्थांमधील कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी देण्याचे जाहीर केले आहे.

राज्य शासनाच्या उद्योग, उर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाचे कार्यासन अधिकारी शामकांत सोनावणे यांनी हे आदेश काढले आहेत.

अत्यावश्यक सेवा म्हणजेच रुग्णालये, वैद्यकीय संस्था आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांना सुटी देणे शक्य नाही. या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्याकडून परवानगी घ्यावी. परवानगी देताना स्थानिक मतदारसंघातच ज्यांचे मतदान आहेत त्या मतदारांना मतदानासाठी दोन तासांची सवलत दिली जाईल, याची खात्री करून कार्यवाही करावी, असेही आदेशात नमूद केले आहे.

# कांदा, दूध दरवाढीचे खासदार निलेश लंके यांचे आंदोलन स्थगित

**अहमदनगर** : कांदा आणि दूध दरवाढीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खासदार निलेश लंके यांचे मागील तीन दिवसापासून जन आक्रोश आंदोलन सुरू होते. रविवारी रात्री पालकमंत्री तथा दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मध्यस्थीने आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.


केंद्र सरकारकडे कांदा निर्यात बंदी लागू करू नये, यासाठी पाठपुरावा करण्यात येईल तसेच शेतकऱ्यांना दूध दरवाढ व अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने नुकताच घेतला आहे. पुन्हा सर्व घटकाशी चर्चा करून अधिवेशनात फेरनिर्णयाबाबत प्रयत्न करू, आश्वासन विखे पाटील यांनी दिले.

मागील तीन दिवसापासून खासदार लंके यांच्या नेतृत्वाखाली दूध व कांदा दर वाढीसाठी जन आक्रोश आंदोलन सुरू होते रविवारी शहरातून ट्रॅक्टर रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत मोठ्या प्रमाणात शेतकरी सहभागी झाले होते. रविवारी दिवसभर खासदार सुप्रिया सुळे व प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील येणार अशी चर्चा होती. रात्री दहा वाजता जयंत पाटील आंदोलन स्थळी पोहोचले. यानंतर त्यांनी खासदार लंके यांच्यासह आंदोलकांशी चर्चा केली. काही वेळाने पालकमंत्री विखे पाटील देखील शासकीय विश्रामगृहावर दाखल झाले. यानंतर जयंत पाटील व विखे पाटील यांच्यात विश्रामगृहावर महाविकास आघाडीसोबत नेत्यांचा चर्चा झाली. यानंतर सर्वजण आंदोलन स्थळी दाखल झाले.

यावेळी जयंत पाटील म्हणाले की पालकमंत्री विखे पाटील यांच्या सोबत सकारात्मक चर्चा झाली आहे. कांदा निर्यात बंदी लागू होणार नाही, यासाठी केंद्र सरकार सोबत बोलणं सुरू आहे. दूध दरवाढीचा निर्णय घेण्यासाठी सरकारला काही वेळ दिला पाहिजे, यासाठी आंदोलन स्थगित करावे अशी विनंती जयंत पाटील यांनी केली.

विखे पाटील म्हणाले, कांदा व दूध दरवाढीबाबत सरकारची भूमिका शेतकऱ्यांच्या बाजूची आहे. कांदा निर्यात बंदी लागू होऊ नये, यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत केंद्र सरकार सोबत राज्य सरकार चर्चा करत आहे. राज्य सरकारने दुधाला किमान ३० रुपये दर व पाच रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. दुधाचे भाव स्थिर राहण्यासाठी एमएसपी कायदा आणण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शहा यांच्यासोबत चर्चा झाली आहे.

# विद्युत तारेच्या स्पर्शानं तरुणाचा जागीच मृत्यू



**कोल्हापूर** - गवताला लागवड टाकत असताना तुटलेल्या विजेच्या तारेला स्पर्श होवून धक्का बसलेनं करवीर तालुक्यातील वडणगे येथील विक्रम साखळकर या तरुणाचा जागीच मृत्यू झालाय. सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली. साखळकर मळ्यात राहणारा विक्रम आज सायंकाळी गवताला लागवड टाकण्यासाठी शेतात गेला होता. त्याचवेळी शेतात तुटून पडलेली महावितरणची विद्युत तार विक्रमच्या निदर्शनास आली नाही. या तारेला स्पर्श झाल्यानं त्याचा जागीच मृत्यू झालाय. विक्रमचं सात वर्षापूर्वी लग्न झालं होत. त्याला पाच वर्षाची एक मुलगी असून चार दिवसांपूर्वीच त्याला दुसरे कन्यारत्न झालंय. विक्रमच्या अपघाती मृत्यूमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होतीय. या घटनेचची नोंद सीपीआर पोलीस चौकीत झाली.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नवे टर्मिनल येत्या रविवारपासून कार्यान्वित

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

**पुणे** : आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवे टर्मिनल सेवा पुरवण्यास सज्ज होत असून सीआयएसएफच्या जवानांच्या पूर्ततेनंतर आता तांत्रिक प्रक्रियाही पूर्णत्वास जात आहे. नवे टर्मिनल सुरु झाल्यानंतर पुणेकर प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. येत्या रविवारी म्हणजेच १४ जुलै रोजी हे नवे टर्मिनल सुरु होईल, अशी माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले, पुण्यातील लोकनिर्वाचित खासदार तथा केंद्रीय मंत्री म्हणून आज दिवसभर आयोजित मॅरेथॉन बैठकांमध्ये मी पुणे शहर आणि परिसरातील विविध विकासकामांचा आढावा घेतला. यामध्ये पुणे महानगरपालिका, पीएमपीएमएल, पुणे मेट्रो, पुणे विमानतळ तसेच पुणे रेल्वे विभाग यांच्याशी संबंधित विविध कामांची माहिती घेण्यात आली. वरील सर्व विभागांमधील प्रगतीपथावरील सर्व कामे वेगाने पूर्ण करण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नव्या टर्मिनलसंदर्भात बोलताना ते म्हणाले की नवे टर्मिनल सुरु करण्यासाठी सीआयएसएफच्या अतिरिक्त जवानांची आवश्यकता होती. यासाठी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन यासाठी पाठपुरावा केला. त्यास तातडीने परवानगी मिळून सीआयएसएफचे जवान पुणे विमानतळावर दाखलही झाले आहेत. त्यानंतर पुढील तांत्रिक प्रक्रिया सुरु झाली आहे.

केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ पुढे म्हणाले, 'नव्या टर्मिनलमध्ये इनलँड बॅगेज सिस्टिम बसवण्याची प्रक्रियाही पूर्ण झालेली असल्याने नवे टर्मिनल कार्यान्वित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे येत्या १४ जुलैपासून नवे टर्मिनल पुणेकरांच्या सेवेत असणार आहे'

ते पुढे म्हणाले, आपल्या पुणे शहरासाठी अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या पीएमपीएमएलचे सक्षमीकरण करणे, हा आपला प्राधान्याचा विषय असून या संदर्भात पीएमपीचे अध्यक्ष डॉ. संजय कोलते आणि विविध विभाग प्रमुखांशी चर्चा केली. पुणे शहरात मेट्रो मार्गांचा विस्तार होत असला तरी पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांची लोकसंख्या लक्षात घेता आवश्यक बसेसची संख्या पूर्ण करणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने एकूण ७७७ नवीन बसेस लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहेत.

शहराचे पर्यावरण व सार्वजनिक वाहतूक यांचा समतोल साधण्यासाठी डिझेल बसेसचे रूपांतर उछ्न्न बसेसमध्ये करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. २२६ डिझेल बसेस आता उछ्न्न बसेसमध्ये लवकरच रूपांतरित करण्यात येणार आहेत, तशी प्रक्रिया देखील सुरू झालेली आहे.

पुणे मेट्रोच्या सद्यस्थिती आणि भविष्यातील योजनेबाबत बोलताना ते म्हणाले, पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण पंतप्रधान मा.श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या शुभहस्ते झाले. तेव्हापासून ते आजपर्यंतच्या प्रवाशांच्या आकडेवारीवरून मेट्रोच्या रुपाने पुणेकरांसाठी सक्षम वाहतूक व्यवस्था तयार होत आहे, हे स्पष्ट आहे. शहरातील काही भागात मेट्रो मार्गांचा विस्तार करण्यात येत आहे. त्यात स्वारगेट ते कात्रजदरम्याचा भूमिगत मार्गही असून केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर त्वरीत त्याचे काम सुरू होईल. दुसऱ्या टप्प्यातील वनाज ते चांदणी चौक, एसएनडीटी ते माणिकबाग, हडपसर-लोणीकाळभोर या मार्गांबद्दलही विचार सुरू आहे. याला मान्यता मिळाल्यावर त्याचे काम सुरू होईल.

यावेळी पुणे विमानतळावरील टर्मिनलपर्यंत मेट्रो नेणे आणि चांदणी चौक ते हिंजवडी या मार्गाबद्दल सर्व मुद्द्यांविषयी अधिकाऱ्यांसोबत चर्चा झाली. महत्वाचे म्हणजे पुणे मेट्रो आणि फिडर बससेवेद्वारे अधिकाधिक नागरीकांना फायदा होण्यासाठी शेवटच्या टोकापर्यंच मेट्रो कनेक्टीव्हिटी देण्यावर आपण भर दिला पाहिजे, अशी सूचना केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली.

यासोबतच, पुणे महानगरपालिकेशी संबंधित रस्ते, उड्डाणपुल, नदीसुधार प्रकल्प, २४द७ पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आणि इतर रखडलेले प्रकल्प यांच्याबाबतही केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी आढावा घेतला. वरील सर्व प्रकल्प वेगाने पूर्ण करून नागरिकांचे जीवन सुखकर करावे, अशी सूचनाही मुरलीधर मोहोळ यांनी केली.



**जॉन डीअर कंपनीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना निवड पत्र देताना पी. आर. भोसले व मान्यवर.**

# संजीवन पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची जॉन डीअर कंपनीत निवड

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा** : येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनच्या पदविका विभागातील विद्यार्थ्यांची पुणे येथील जॉन डीअर या बहुराष्ट्रीय कंपनीत अभियंता म्हणून निवड झाली. महाविद्यालयामध्ये संपन्न झालेल्या जॉन डीअर या कंपनीच्या मुलाखतीमध्ये इलेक्ट्रीकल विभागातील प्रज्ञा पाटील व अमृता पाटील या विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थिनींना संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले यांच्या हस्ते निवड पत्र देवून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी पदविका प्राचार्य प्रा. निशांत थरकार, आर अँन्ड डी अधिष्ठाता डॉ. अजित काटकर, कार्यालयीन अधीक्षक दिपक पाटील, पदविका ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ऑफिसर प्रा. रणजितसिंह माने, प्रा. धैर्यशील दिंडे, मेकॅनिकल विभागप्रमुख प्रा. तौफिक मुल्ला, प्रा. अमोल सोळसे, इलेक्ट्रीकल विभागप्रमुख प्रा. विद्याश्री खोत उपस्थित होते. सदर विद्यार्थिनींना पदवी विभागाचे प्राचार्य डॉ. संजीव जैन व शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. एकनाथ साळोखे यांचे मार्गदर्शन लाभले.

# लंडनमधील वाघनखे ही छ. शिवाजी महाराज यांची नाहीतच

## शिवरायांची खरी वाघनखे साताऱ्यातून बाहेर गेलीच नाहीत;इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांचा दावा

**कोल्हापूर** : छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या वाघ नखांनी अफजल खानाचा कोथळा बाहेर काढला ती सध्या लंडनमधील म्युझियम मध्ये असल्याचा दावा केला जात आहे. ही वाख नखे महाराष्ट्र सरकार भारतात परत आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. मात्र जी वाघ नखे भारतात येणार आहेत ती छत्रपती शिवाजी महाराजांची नाहीत असा दावा इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांनी केला आहे. तसेच याबाबत महाराष्ट्र शासन दिशाभूल करत असून शासन सध्या जी वाघनखं आणणार आहे ती वाघनखं १९७१ साली विक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममध्ये दाखल झाली आहेत आणि अस्सल वाघनख ही सातारा इथल्या छत्रपतींच्याकडे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले

लंडन इथल्या विक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममध्ये असणाऱ्या विविध प्रकारच्या वाघनखांपैकी एक वाघनख ३ वर्षांसाठी भाडेतत्त्वावर आणण्याचा सामंजस्य करार महाराष्ट्र शासन आणि व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम यांच्यामध्ये ३ ऑक्टोबर २०२३ रोजी करण्यात आलाय . राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही वाघनख छत्रपती शिवाजी महाराजांची असल्याचा दावा केला होता . मात्र ही वाघनखं छत्रपती शिवाजी महाराज यांची नसल्याचे ठोस पुरावे कोल्हापुरातील सह्याद्री इतिहास संशोधन केंद्राचे अध्यक्ष इंद्रजित सावंत यांनी सांस्कृतिक कार्यमंत्री , सांस्कृतिक कार्य विभाग सचिव आणि महाराष्ट्र राज्य पुरातत्व संचालनालयाकड वारंवार सादर केले होते . मुख्यमंत्री यांनाही त्यांनी याबाबत कळवलं होतं .



मात्र याबाबत शासनानं उदासीनता दाखवल्याचा आरोप आज इंद्रजित सावंत यांनी पत्रकार परिषदेत केलाय .ही वाघनखं छत्रपती शिवाजी महाराज यांची नाहीत, अशी कबुली विक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमन दिली आहे या कबुलीबाबतच पत्र आपल्याला प्राप्त झाल्याचं त्यांनी सांगितलं . हे पत्र त्यांनी पत्रकारांसमोर सादर केल .महाराष्ट्र शासनान ३० कोटी रुपये खर्च करून या वाघनखांबाबत लोन ग्रीमेंट केल्याचं त्यांनी नमूद केल . छत्रपती शिवाजी महाराज यांची नसलेली ही वाघनखं ठेवण्यासाठी प्रत्येक ठिकाणी सात ते आठ कोटींचा खर्च करण्यात येणार असून ,याचं टेंडरही राज्याबाहेरच्या व्यक्तीला दिल्याच त्यांनी सांगितल . त्यामुळे शासनान महाराष्ट्रातील जनता आणि शिवप्रेमींची फसवणूक करू नये असं त्यांनी सांगितले .

पत्रकार परिषदेला सैफ शेख,अमित आडसुळे, राम यादव,ओंकार कोळेकर आणि दिगंबर भोसले उपस्थित होते .

# अमरावतीत आढळले ४८ डेंग्यूचे रुग्ण; आरोग्य यंत्रणा सतर्क; काळजी घेण्याचं आवाहन

जानेवारी महिन्यापासून आतापर्यंत अमरावती जिल्ह्यात ४८ डेंग्यूचे रुग्ण आढळले आहेत. अमरावती जिल्ह्यात डेंग्यू, चिकनगुनिया या आजारांचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौंदळे यांनी माहिती दिली आहे. डॉ.दिलीप सौंदळे यांनी सांगितलं की, अमरावती जिल्ह्यात जानेवारी महिन्यापासून डेंग्यू, चिकनगुनियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळले आहेत. आतापर्यंत डेंग्यूचे ४८ रुग्ण आढळले आहेत. त्यामध्ये शहरी भागातील २४ रुग्णांचा समावेश आहे. चिकनगुनियाचे २५ रुग्ण ग्रामीण भागामध्ये आढळले असून ७ रुग्ण शहरी भागात आहेत.

राज्यात सर्वत्र पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे अनेक भागांत पाणी साचून डासाची उत्पत्ती होते. त्यामुळे अडगळीच्या ठिकाणी पाणी साठणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. आठवड्यातून एक दिवस नागरिकांनी कोरडा दिवस पाळावा. तसे केल्यास डेंग्यू, चिकनगुनिया यांसारख्या डासांची उत्पत्ती होणार नाही. नागरिकांनी शरीर पूर्ण झाकेल असे कपडे वापरावे तसेच नेटचा वापर करावा. आजूबाजूच्या परिसरात डासांची उत्पत्ती होणार नाही याची काळजी घ्यावी, असं आवाहन डॉ. दिलीप सौंदळे यांनी केलं आहे.



**डेंग्यूची लक्षणे**

अधिक तीव्रतेचा ताप

डोळे आणि डोके दुखी

अंगदुखी आणि अशक्तपणा

तोंडाला कोरड पडणे

उलट्या होणे

त्वचेवर लाल व्रण उठणे

तळहात आणि तळपायांना खाज येणे

भूक कमी लागणे किंवा मळमळणे

हिरड्यांमधून अथवा नाकातून रक्तस्त्राव होणे

प्रचंड अशक्तपणा येऊन भोवळ येणे

**उपाय**

घरांच्या अवती-भवती अथवा टेरेस वर पडलेल्या रिकाम्या कुंड्या, प्लॅस्टिकच्या वस्तू, टायर यासारख्या वस्तूंमध्ये पावसाचं पाणी साचून त्यात डासांची उत्पत्ती स्थाने निर्माण होतात. अशी ठिकाणे नष्ट करावीत. खिडक्यांना जाळ्या बसवून (स्क्रीनिंग करून) घरात किंवा कार्यस्थळी डासांच्या शिरकावा होण्यास प्रतिबंध करावा. आपल्याला डास चावणार नाहीत यासाठी सर्वतोपरी बंदोबस्त करावा. आजाराची लक्षणे आढळून आल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# भर पावसाळ्यात ६५ लाख मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात

**मुंबई** : मुंबईतील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या ६५ लाख गोरगरीब जनतेच्या आरोग्याची काळजी घेत आरोग्य सेवा देणाऱ्या आशा सेविकांनी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आझाद मैदानात आंदोलनाचा इशारा दिला असल्याने भर पावसाळ्यात ५६ लाखझोपडपट्टीवासियांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

मुंबई महानगरात झोपडपट्टीवासियांची लोकसंख्या सुमारे ६५ लाख आहे व त्यांना आरोग्य सेवा देणाऱ्या आरोग्य सेविकांची पदे कित्येक वर्षे न भरल्याने त्या जागा रिक्त आहेत. त्या जागी आशा सेविकांनी काम करावे हे मुंबई पालिकेला अपेक्षित आहे.मानधन वाढ नाही.कामाची खात्री नाही आणि आता कामाचे तास व बोजा वाढणार.त्यामुळे या आंदोलनाची हाक दिली आहे.

२५०० लोकसंख्येला १ याप्रमाणे आशा भराव्यात असे सरकारचेच दिशानिर्देश आहेत. याप्रमाणे सुमारे २५०० ते २६०० आशांची गरज आहे परंतु त्या ऐवजी फक्त ७०० आशा नेमल्या गेल्या आहेत. तरी उर्वरित सुमारे १८०० आशांची भरती करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवून तो मंजूर करवून घ्यावा. नव्याने निर्माण होणाऱ्या जागांवर पालिकेने स्वतः नेमलेल्या आशा सेविकांना समाविष्ट करून घेण्यात यावे अशी मागणी संघटनेच्या जिल्हा सरचिटणीस आरमायटी इराणी यांनी केली आहे.

पालिकेत कार्यरत आशा सेविकांना राज्य शासनाचे वाढीव मानधन मिळत नसल्यामुळे त्यांना आर्थिक चणचणीला तोंड द्यावे लागत आहे हे लक्षात घेऊन त्यांना सर्व लाभ पालिकेने देऊन समान कामाला समान वेतन या तत्वाचे पालन करावे. मानधन वाढल्याची घोषणा झाल्यापासून त्यांचे मोबदला आधारित काम व त्यांचे दर कमी करण्यात आले आहेत. या कामाचा मोबदला मासिक कामांच्या मानधनाव्यतिरिक्त दिला गेले पाहिजे तरच मुंबई सारख्या महानगरात त्यांना जगण्याइतके उत्पन्न मिळेल. दर महिन्याला नियमितपणे मानधन देण्यात यावे. व त्यांच्या मोबदल्यावर असलेली रु. ६००० ची मर्यादा काढून टाकून त्या जितके काम करतील त्याचा त्यांना संपूर्ण मोबदला द्यावा.

# अलमट्टी, हिप्परगी धरणातील सध्याचा पाणीसाठा धोकादायक

**सांगली** : कोयना, वारणा, राधानगरीसह कृष्णा खोऱ्यातील सर्वधरणांच्यापाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण वाढण्याचे हवामान विभागाकडून संकेत आहेत. त्यामुळे हिप्परगी, अलमट्टीधरणातीलसध्याचापाणीसाठाअत्यंत धोकादायक आहे. केंद्र जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तोपाणीसाठाचुकीचा आहे. त्यामुळे राज्य शासनाने कर्नाटकला पाणी सोडण्याबाबत सूचना द्यावी, अशी मागणी कृष्णा महापूर नियंत्रण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी कोल्हापूर जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

कृष्णा महापूर नियंत्रण समितीने दिलेल्या निवेदनात म्हटले की, केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अलमट्टी धरणाची पाणी पातळी १५ जूनपर्यंत ५०८.६२ मीटर, ३० जूनपर्यंत ५१३.६० मीटर, १५ जुलैपर्यंत ५१७.११ मीटर व ३० जुलै रोजी ५१३.६० मीटर, तसेच ३० ऑगस्टपर्यंत ५१७ मीटरच्या पुढे पाणी साठा करण्यास हरकत नाही. हाच नियम हिप्परगी बंधाऱ्याबाबतही आहे. हिप्परगी येथील बॅरेजची संपूर्ण दारे उघडी करून ३० ऑगस्टपर्यंत हिप्परगीची पाणी पातळी ५१७ मीटर ठेवण्यात यावी, असे ठरले होते. ठरल्यानुसार केंद्रीय जल आयोगाच्या तत्त्वांची अंमलबजावणी कर्नाटक जलसंपदा विभागाने केल्याचे दिसून येत नाही. अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधारा येथे जास्तीत जास्त पाणीसाठा करून ठेवायचे त्यांचे नेहमीचेच धोरण दिसत आहे.

# पहिल्याच पावसात महाभ्रष्ट सरकारचे पितळ उघडे पडले; नाना पटोलेंचा हल्लाबोल

मुंबई : मुंबई व उपनगरातील परिस्थिती पहिल्याच पावसाने अत्यंत भयावह झाली आहे. मुंबई व उपनगरातील अनेक भाग पाण्याने तुडुंब भरले, रेल्वे व रस्ते वाहतूक ठप्प होऊन मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. महानगरपालिका व रेल्वे प्रशासन यांच्यात कसलाही समन्वय नाही तर दुसरीकडे भ्रष्टाचारामुळे मुंबईकरांना शिंदे सरकारच्या पापाची फळे भोगावी लागत आहे. एकाच पावसात देशाची आर्थिक राजधानी पाण्याखाली जाते हे अत्यंत गंभीर आहे. पावसाने शिंदे-फडणवीस-अजित पवार सरकारचे पितळ उघडे पाडले असून महाभ्रष्युती सरकारने, चुल्लू भर पानी में मुंबई को डुबा दिया, असा घणघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.



पटोले पुढे म्हणाले की, मुंबई महानगरपालिकेचे कारभारी स्वतः मुख्यमंत्री आहेत पण चुकीच्या व्यक्तीच्या हातात राज्याची सुत्रे असल्याने मुंबई व महाराष्ट्राला त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. महापालिकेच्या कार्यालयात दोन पालकमंत्र्यांची कार्यालये मुंबईकरांच्या कष्टाचे पैसे खाण्यासाठी काढली आहेत का? असा संतप्त सवाल विचारून स्वतःच्या अपयशाचे खापर मुख्यमंत्री पावसावर फोडत आहेत. मुंबईत झालेला पाऊस हा काही पहिल्यांदाच झालेला नाही. यापेक्षा मोठा पाऊस मुंबईत झालेला आहे पण आजच्या सारखी बिकट परिस्थिती झाली नव्हती. राजकारणापेक्षा मुंबईच्या कामात जास्त लक्ष घातले असते तर आजची परिस्थिती उद्भवली नसती. मुंबईत कोट्यवधी रुपयांचे सिमेंट रस्ते बांधले पण त्यात खड्डे आहेत. कोस्टल रोडच्या बोगद्याला गळती लागली, अटल सेतूला भेग्या पडल्या, हा महायुतीचा विकास आहे का? महापालिकेने मान्सूनपूर्व कामे केली, नालेसफाई केली असा सरकारचा दावा आहे तो या पावसाने खोटा ठरवला. मुख्यमंत्री ग्रीन कार्पेटवर उभा राहून नालेसफाईच्या पाहणीचे बिभत्स प्रदर्शन करत होते. त्यांच्या इव्हेंटबाजीचा पर्दाफाश झाला आहे. नालेसफाईत सुद्धा हातसफाई करुन खिसे भरण्याचेच काम झाले म्हणून मुंबई तुंबली. एकाच पावसात विधिमंडळाचे अधिवेशन दिवसभरासाठी तहकूब करावे लागले हे या सरकारचा गलथानपणा व निष्काळजीपणाचे उदाहरण आहे, अशी टीका पटोले यांनी केली.

मुंबईत पावसाने जनजीवन ठप्प केले असताना राज्याच्या अनेक भागात मात्र अद्याप हजेरी लावलेली नाही. अनेक भागात दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यावर ओढवले आहे. पाणीटंचाईची अवस्था अत्यंत भयंकर आहे. अनेक गावांत पाण्यासाठी माता भगिणींना पाच पाच किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. टँकरमाफिया आणि सरकारी अधिकारी संगनमत करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करत आहेत. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. सरकार फक्त मंत्रालयातून आदेश देते पण प्रशासन खाली काहीच काम करत नाही, याकडे राज्य सरकार कधी लक्ष देणार, असे नाना पटोले म्हणाले.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे. पोलिसांचा धाकच नसल्याने गुन्हेगार मोकाट आहेत. पुण्यातील पोर्श अपघातातून सरकारने काहीही बोध घेतलेला दिसत नाही. वरळीत एका महिलेला भरधाव गाडीने चिरडले. ही कार शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याची आहे. दारू पिऊन भरधाव वेगाने गाडी चालवल्याने एका निरपराध महिलेचा मृत्यू झाला. शिंदे फडणवीस सरकारला सत्तेचा माज आला आहे, मुख्यमंत्री म्हणतात कोणालाही पाठीशी घालणार नाही पण त्यांना कशाचेही गांभीर्य नाही. महाराष्ट्र सुरक्षित राहिला नाही हा संदेश देशात जात असून ते राज्याच्या हिताचे नाही. राज्यात अधिकारीही सुरक्षित राहिले नाहीत. पुण्यात वाहतूक शाखेच्या महिलेवर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रकार घडला, महाराष्ट्र गुंडाराज व माफिया राज करुन ठेवले आहे. सरकारचा प्रशासनातील हस्तक्षेप, पैसे घेऊन बदल्या करणे अशा प्रकारांमुळे प्रशासन काम करत नाही त्याचे परिणाम जनतेला भोगावे लागत आहेत. सरकारला जाग आली नसेल तर जनताच आता त्यांना घरी पाठवेल, असेही नाना पटोले म्हणाले.

# कोथळी - समडोळी बंधाऱ्यासाठी ७ कोटींचा निधी मंजूर

## आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या माध्यमातून निधी

**शिरोळ :** पडझड झालेले पिलर, कमकुवत बंधाऱ्याचे बांधकाम, बर्गे घालून सुद्धा सुरू असलेली पाण्याची गळती आणि सततच्या महापुरामुळे बंधाऱ्याची झालेली दयनीय अवस्था याची दखल घेऊन शेतकऱ्यांना वरदान असलेल्या कोथळी-समडोळी बंधाऱ्याच्या मजबुतीसाठी आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत विशेष फंडातून ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याने कोथळी - समडोळी बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम सुरू होणार असून या माध्यमातून बंधाऱ्याला मजबुती प्राप्त होणार आहे. त्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.



येथील वारणा नदीवरील कोथळी-समडोळी दरम्यानच्या कोल्हापूर बंधाऱ्याची दुरवस्था झाली आहे. चार पिलरची मोठी पडझड झाली असून त्यामधून मोठ्या प्रमाणात गळती सुरू आहे. या पडझडीमुळे बंधारा कमकुवत होत असून बंधाऱ्याला धोका निर्माण होण्याची भीती आहे. त्यामुळे बंधाऱ्याचे स्ट्रक्टरल ऑडिट व तत्काळ मजबूत दुरुस्ती करण्याची मागणी शेतकरी व नागरिकांमधून होत होती. याची दखल घेऊन या बंधाऱ्यासाठी आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत निधीतून ७ कोटी रुपयांचा निधी आचारसंहिते पूर्वीच मंजूर झाला असल्याने लवकरच या बंधाऱ्याचे काम सुरू होणार आहे.

### पावसाळा झाल्यानंतर होणार कामाला सुरुवात

**वारणा नदीवरचा कोथळी - समडोळी हा बंधारा शेतकऱ्यांना वरदान आहे. मात्र, बंधाऱ्याची झालेली दुरावस्था, सुरु असलेली पाण्याची गळती यासह बंधाऱ्याला निर्माण झालेला धोका लक्षात घेता आचारसंहितेच्या पूर्वीच या बंधाऱ्यासाठी ७ कोटींचा निधी मंजूर करून घेतला आहे. यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, जलसंपदा मंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले असून लवकरच निविदा प्रक्रियेचे काम पूर्ण होऊन पावसाळ्यानंतर प्रत्यक्ष या बंधाऱ्याच्या कामाला सुरुवात होणार आहे.**

**- आमदार डॉ.राजेंद्र पाटील यड्रावकर**

१९७२-७३ मध्ये हा बंधारा बांधला आला होता. बंधाऱ्याची लांबी ८७ मीटर, तर उंची सात मीटर आहे. एकूण २६ गाळे असून पाणी अडविण्यासाठी या आधी लाकडी, तर आता लोखंडी बर्गे वापरण्यात येतात. या बंधाऱ्याची पाणी साठवण क्षमता ६.३४ दशलक्ष घनमीटर आहे. त्यामुळे दोन्ही तीरावरील साडेचार हजार हेक्टरहून अधिक क्षेत्र ओलिताखाली आले आहे. तसेच यावर अनेक गावांना पिण्याच्या योजना आहेत. दुरुस्ती अंदाजपत्रकातील तरतुदीबंधाऱ्याच्या दगडी प्रस्तंभाचे सर्व कटवॉटर व इंजवॉटर डिसमेंटल करणे, नव्याने सलोह संधानकमध्ये करणे, जोत्यामधील गळती बंद करण्यासाठी सीलपासून बंधाऱ्याच्या पायापर्यंत खोदाई करणे, जोत्याच्या दगडी बांधकामास बंधाऱ्याच्या पायापासून सीलपर्यंत सलोह संधानक करणे, बंधाऱ्याच्या गाळ्यांमधील तुटलेले दगडी बांधकाम करून सलोह संधानक करणे, बंधाऱ्याच्या दगडी प्रस्तंभाचे मजबुतीकरण करणे यासह बंधाऱ्याची डागडुजी या निरीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

## ऊस लावला की काढणीलाच लक्ष, एरवी राजकीय चर्चा : शरद पवार

**सांगली :** ऊस आळसाचे पीक. एकदा लागवड करायची, मग कारखान्याला पाठवतानाच लक्ष द्यायचे. एरवी जगाच्या राजकारणाची चर्चा करत बसायचे. यामुळे शेताचा पोत बिघडतो, क्षारपड होते, याकडे लक्ष देण्याची आता गरज आहे असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोमवारी कवठेएकंद (ता. तासगाव) येथे केले.

तासगाव तालुक्यातील कवठेएकंद येथील सिद्धराज सहकारी शेती पाणीपुरवठा संस्थेच्या कार्यक्रमात बोलतांना ते बोलत होते. यावेळी आ. सुमनताई पाटील, रोहित पाटील यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

यावेळी खा.पवार म्हणाले, एकदा ऊसाची लागवड केली की नंतर थेट ऊस कारखानाला घालवायलाच शेतकरी उसाकडे लक्ष देतो आणि जगाच्या राजकारणाची चर्चा करत बसतोल.पण शेतीच्या गुणवत्ता कडे लक्ष देत नाही. शेतीची उत्पादकता टिकवण्यासाठी जमिनीतचा पोत सुधारण्याचा कार्यक्रम शेतकऱ्यांनी हाती घेतला पाहिजे.

सरकारने वीज फुकट देण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे आता पंप बंद करायला कोण जाईल काय? सरकारने दिलेल्या सवलतीचा गैरवापर करू नका असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# सरकारी आदेशाला सिडकोकडून केराची टोपली

**मुंबई :** आमच्या हक्काची जमीन आम्हाला मिळावी म्हणून विधानसभेत आदेश झाल्यानंतरही सिडको प्रशासन मनमानी कारभार करत असून सरकारी आदेशाला केराची टोपली दाखवत आहे. त्यामुळे पुनर्वसित गावातील ग्रामस्थांनी आझाद मैदानात साखळी उपोषण करण्याचा इशारा सोमवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला आहे.

नवीन शेवा ग्रामपंचायतने अनेक वेळा जे.एन.पी.टी., सिडको, जिल्हाधिकारी रायगड व तहसिलदार उरण यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार करूनसुद्धा आजपर्यंत आम्हाला जागेचा ताबा मिळालेला नाही. माजी आमदार मनोहर भोईर यांनी विधान भवनामध्ये हा विषय घेतला होता. त्या वेळेस जमिनीचा ताबा देण्यात यावा असा आदेश असताना सिडकोने त्या आदेशाचा पालन केलेले नाही अशी माहिती ग्रामस्थांनी दिली.




पुनर्वसित नवीन शेवा गावाचा पुनर्वसन १९८७ साली बोकडविरा येथील सर्व्हे नं. ११२ मध्ये एकुण क्षेत्रफळ ३३.६४ हेक्टर जमिनीमध्ये झालेला असताना. सिडकोकडून फक्त १०.५० हेक्टर मध्ये नवीन शेवा गावाचा पुनर्वसन करण्यात आलेला आहे. तसेच उर्वरित जागा सिडकोच्या ताब्यात असून ती जागा ग्रामस्थांना मिळावी म्हणून अनेकवेळा मोर्चा, आंदोलन, उपोषणे केलेली आहेत. परंतु कित्येकवेळा ग्रामस्थांना आश्वासनांची खैरात देऊन पुनर्वसित नवीन शेवा ग्रामस्थांची फसवूक केलेली आहे असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

त्यामुळे गेल्या ३७ वर्षात नवीन शेवा ग्रामस्थांना राहण्यासाठी पुरेशी जागा होत नसल्यामुळे एकत्रित कुटुंबांना राहणे अवघड झाले आहे. त्यामुळे अनेक वर्षे वाट बघून सुद्धा शासन आमच्या कडे लक्ष देत नाही. त्यामुळे आम्ही नवीन शेवा ग्रामपंचायत सर्व सदस्य, ग्रामस्थ व गावाचे अध्यक्ष कमलाकर पाटील यांनी ९ जुलै रोजी आझाद मैदान येथे साखळी उपोषण करणार आहोत.

# मुसळधार पावसाचा अमरनाथ यात्रेला फटका; यात्राच करावी लागली स्थगित

**नवी दिल्ली :** सध्या देशातील अनेक भागांत मुसळधार पाऊस होत आहे. तर काही भागांत पावसाने ओढ दिली आहे. असे असताना जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पाऊस होत आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत होताना दिसत आहे. या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर अमरनाथ यात्रा तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आली. याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

अमरनाथ गुहेत मोठ्या प्रमाणात उष्णता वाढत आहे. या वाढत्या उष्णतेमुळे शिवलिंग वेळेपूर्वी वितळले आहे. पवित्र गुहेतील बर्फ शिवलिंग पूर्णपणे वितळल्याने नवीन अमरनाथ यात्रेकरूंची निराशा झाली. गेल्या आठवडाभरात कमाल तापमानामुळे वितळण्याच्या प्रक्रियेला वेग आला असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. अमरनाथ यात्रा सुरू झाल्यानंतर सातव्या दिवशी म्हणजे ५ जुलै रोजी बाबा बर्फानी अदृश्य झाले होते. प्रथमच असे घडल्यासे सांगण्यात येत आहे. आता येथे येणाऱ्या भाविकांना फक्त पवित्र गुहेचेच दर्शन घेता येणार आहे. या मुसळधार पावसाचा फटका आता अमरनाथ यात्रेला बसणार आहे.



# शाहुवाडी तालुक्यात भात रोप लावणीच्या कामाला वेग; पावसाने शेतकरी सुखावला




**शाहुवाडी :** शाहुवाडी तालुक्यामध्ये गेल्या आठ दिवसांपासून जोरदार पाऊस होत असल्याने भात रोप लावणीच्या कामांना वेग आला आहे. परिसरात सगळीकडे रोप लावणीची धांदल उडाली असून, शेत शिवारे माणसांच्या गर्दीने फुलून गेली आहेत. अगदी योग्य वेळेत पावसाची सुरुवात झाल्याने शेतकरी सुखावला आहे. जोरदार पावसात बैलांच्या औताच्या साहाय्याने किंवा रोटावेटरच्या मदतीने चिखलगट्टा करून रोपे लावली जात आहेत.

शाहुवाडी तालुक्यामध्ये विशेषतः उत्तर भागात भात शेती ही मोठ्या प्रमाणात केली जाते. परिसरातील उखळु, शित्तूर, वारूण, विरळे, जांबूर, कांडवण या परिसरात रोप पद्धतीने भाताची लावण केली जाते. त्यासाठी मृग नक्षत्राच्या सुरूवातीलाच आपल्याला हव्या असणाऱ्या भात बियानांचा ङ्गतरवाफ टाकला जातो. त्या तरव्याची वाढ रोप लावणीयोग्य होताच नंतर रोप लावली जातात.

पावसाने आता दमदार सुरुवात केल्याने रोप लावणीस वेग आला आहे. एकाच वेळी सगळ्यांचीच रोप लावणं असल्याने परिसरात शेतमजुरांचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे पैरा पद्धतीने रोप लावण करून घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

# परभणीच्या पालम तालुक्यात मुसळधार पाऊस; नदीला पूर; ५ गावांचा संपर्क तुटला

**परभणी :** २ दिवसांच्या विश्रांतीनंतर परभणी जिल्ह्यात पुन्हा मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. परभणी जिल्ह्यातील पालम तालुक्यात रविवार रात्रीपासून मुसळधार पावसानं हजेरी लावली आहे. रात्रीपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसाचा जोर पहाटेच्या सुमारास वाढला. त्यामुळे तालुक्यातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचलं आहे, त्यामुळे नागरिकांना आणि वाहन चालकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील गळाटी नदीला पूर आला आहे. त्यामुळे ५ गावांचा संपर्क तुटला. ज्यामध्ये फळा, सोमेश्वर, घोडा, आरखेड, उमरथडी या पाच गावांचा समावेश आहे.



परभणी जिल्ह्याच्या अनेत तालुक्यात २ दिवसांच्या विश्रांतीनंतर मुसळधार पाऊस बरसत आहे. पावसाने हजेरी लावल्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. तसेच पिकांना देखील दिलासा मिळाला आहे. मुसळधार पावसामुळे पालम तालुक्यातील गळाटी नदीला पूर आला आहे. नदीला पूर आल्याने फळा, सोमेश्वर, घोडा, आरखेड, उमरथडी या पाच गावांचा संपर्क तुटला आहे. या नदीवरील पुलाचं काम सुरु आहे. मात्र अनेक महिने उलटूनही कंत्राटदाराने वेळेत या रस्त्याचं काम पूर्ण केलं नाही. त्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

मुख्य पुलाचं काम पूर्ण न झाल्यानं वाहतूक करण्यासाठी सिमेंट नळी टाकून तात्पुरात रस्ता तयार करण्यात आला होता. मात्र मुसळधार पावसामुळे हा रस्ता पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे आज दिवसभर या रस्त्यावरील वाहतूक बंद राहणार असल्याचं तालुका प्रशासनाने सांगितलं आहे. परभणी जिल्ह्यातील प्रकल्प साठ्यात अद्याप वाढ झाली नाही. त्यामुळे परभणीकर अजूनही दमदार पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

**बुलढाणा जिल्ह्यात पावसाची संततधार**

बुलढाणा जिल्ह्यात काल दुपारपासून पावसाची संततधार सुरू होती. त्यानंतर रात्रीच्या सुमारास पावसाचा जोर वाढला. अनेक भागांत मुसळधार पावसानं हजेरी लावली. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचलं. अनेक शेतात पावसाचे पाणी साचल्याने पिके पाण्याखाली गेली आहेत. शेतकऱ्यांनी नुकत्याचं शेती पिकाच्या पेरण्या केल्या आहेत. मुसळधार पाऊस कोसळल्यामुळे पिकांना नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## भारतीय विद्या भवन, इन्फोसिस फाऊंडेशनचा सांस्कृतिक प्रसार उपक्रम

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'राम पर्व' हा कार्यक्रम शनिवार,१३ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे.'व्यक्ताव्यक्त' ,पुणे प्रस्तुत या कार्यक्रमात रामायणातील प्रसंगांवर नव्याने शब्दबद्ध आणि संगीतबद्ध केलेली गीते सादर केली जाणार आहेत.

रामायणातले काही प्रसंग आणि ज्यांच्यावर काव्य लेखन झालेले नाही असे प्रसंग आणि पात्रं शोधून त्यावर काव्य लिहिण्याचा हा प्रयत्न 'पार्थ' (अमित गोखले) या कवीने केलेला आहे. या रचनांना गीतरामायणाच्या पद्धतीनेच संगीतबद्ध करण्याचा प्रयत्न हेमंत आठवले आणि सौ. जान्हवी गोखले यांनी केला आहे. शुभदा आठवले,केदार तळणीकर,अवधूत धायगुडे,वेधा पोळ साथसंगत करणार आहेत.

हा कार्यक्रम भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे होणार आहे.रसिकांना तो विनामूल्य खुला आहे.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २१७ वा कार्यक्रम आहे,अशी माहिती भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीला सुरूंग; शेकडो पदाधिकारी शरद पवारांकडे

**नाशिक:** लोकसभा निवडणुकीनंतर राज्यातील राजकीय उलथापालथींना वेग आला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला नाशिकमध्ये सुरूंग लागला आहे. नाशिकमधील तब्बल १०० पदाधिकाऱ्यांनी बारामती येथील गोविंद बागेत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान शेकडो पदाधिकाऱ्यांनी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केल्याची माहिती आहे.

अजित पवार यांच्यासह काही आमदार भाजपसोबत सत्तेत सामील झाले आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. या फूटीनंकपही शरद पवार नव्या जोमाने मैदानात उतरले. लोकसभा निवडणुकीच्या काळात त्यांनी पुन्हा संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. निवडणुकीत त्यांचे आठ खासदार निवडून आणले. पण अजित पवार यांना मात्र एकाच जागेवर विजय मिळवता आला.

पण लोकसभा निवडणुकीनंतर राज्यातील वारे फिरू लागल्याचे काही राजकीय तज्ञ म्हणत आहे. अजित पवार यांच्यासोबत गेलेले अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारी पुन्हा शरद पवार यांच्या पक्षात परत जात आहेत. लोकसभेला बसलेला फटका आणि विधानसभा निवडणूका पाहता महायुतीची धाकधूक चांगलीच वाढली आहे.

नाशिकचे तब्बल १०० पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांच्या गटात प्रवेश केला. यात अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष नानासाहेब महाले यांचाही समावेश आहे. बारामतीच्या गोविंद बागेत शरद पवारांची भेट घेण्यासाठी हे पदाधिकारी बराच वेळ थांबले होते. अखेर शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केला.

इतकेच नव्हे तर, पंढरपूरमध्येही भगीरथ भालके यांनी आज शरद पवार यांची भेट घेतली. काही महिन्यांपूर्वी त्यांनी राष्ट्रवादीला रामराम करत बीआरएसमध्ये प्रवेश केला होता. त्यांनीही आज गोविंद बागेत शरद पवार यांची भेट घेतली. पण आपण पंढरपूर तालुक्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी आल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र त्यांच्या भेटीमागे वेगळेच कारण असल्याचीही चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्यामुळे आगामी काळात भगीरथ भालके कुणाकडे जातात, हे पाहणेही महत्त्वाचे ठरणार आहे.

## काँग्रेसकडून विरोधाचे कॅम्पेन सुरू

**कोल्हापूर :** लाडकी बहीण योजनेमुळे महिला वर्ग महायुतीच्या बाजून झुकेल, काँग्रेसचे हक्काचे मतदानही महायुतीला होईल या भितीने काँग्रेसकडून विरोधाचे कॅम्पेन सुरू आहेत. आता ते फॉर्म भरुन घेतील आणि नंतर जमा करणार नाहीत. आणि निवडणुकीच्या तोंडावर सरकारने लाभ दिलाच नाही असा कांगावा करतील, अशी टीका खासदार धनंजय महाडिक यांनी रविवारी सायंकाळी पत्रकार परिषदेमध्ये केली.

महाराष्ट्र राज्य शासनाने नुकताच अर्थसंकल्प जाहीर केला आहे या अर्थसंकल्पामध्ये लोकं कल्याणच्या जनतेच्या हिताच्या अनेक योजना आहेत त्याची माहिती यावेळी सविस्तरपणे देण्यात आली. पत्रकार परिषदेला माजी आमदार अमल महाडिक, महानगर जिल्हाध्यक्ष विजय जाधव, ग्रामीण जिल्हाध्यक्ष राहुल देसाई, राजवर्धन निंबाळकर, सत्यजित कदम, राहुल चिकोडे, नाथाजी पाटील, भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्षा रुपाराणी निकम आदी उपस्थित होते.

# प्रशासन सज्ज, नदीकाठच्या ग्रामस्थांनी सतर्क रहावे

## आमदार डॉ राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या सूचना

**शिरोळ :** गेल्या काही दिवसापासून धरण क्षेत्राबरोबर शिरोळ तालुक्यात जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे शिरोळ तालुक्यातील पंचगंगा, कृष्णा, दूधगंगा आणि वारणा या नद्यांच्या पाणीपातळीत मोठ्या प्रमाणात वाढ होत असून नदीकाठच्या ग्रामस्थांनी कोणतीही भिती न बाळगता सतर्क रहावे, महापुराच्या पार्श्वभूमीवर शिरोळ तालुक्यातील आपत्ती यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असल्याची माहिती आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी दिली.



शिरोळ तालुक्यातील नद्यांच्या पात्रात होणारी वाढ व संभाव्य परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आमदार डॉ.राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी पूरप्रवन भागात भेटी देऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी बोलताना आमदार डॉक्टर राजेंद्र पाटील यड्रावकर पुढे म्हणाले, हवामान विभागाने धरण क्षेत्राबरोबर कोल्हापूर जिल्ह्याला जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. गेल्या काही दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे नद्यांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे नदीकाठच्या ग्रामस्थांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या संपर्कात रहावे, स्थानिक प्रशासनाबरोबर तालुका प्रशासनातील सर्वच अधिकारी कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन ज्या - त्या सूचना दिलेल्या आहेत. पूरप्रवन भागातील ग्रामस्थांनीही प्रशासनाला सहकार्य करून त्यांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करून ते म्हणाले, महापुरासंदर्भात महाराष्ट्र शासन कर्नाटशी समन्वय साधत असून अलमट्टी धरणावर महाराष्ट्र शासनाचा एक अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. याचबरोबर हिप्परगी धरणातून होणाऱ्या पाण्याच्या विसर्गाकडे महाराष्ट्र पाटबंधारे विभाग लक्ष ठेवून असून कोणत्याही परिस्थितीत शिरोळ तालुक्याला महापुराचा धोका होणार नाही, याची परिपूर्ण काळजी महाराष्ट्र शासन घेत असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.